पारनेर दर्शन

वर्ष १ अंक २३१, गुरुवार ३० मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

नगर दक्षिणेच्या हायव्होल्टेज लढतीत विजयाचा कौल कोणाला ?

प्रश्नांच्या ध्रुवीकरणावरच विजयाचे गणित अवलंबून

नगर: प्रतिनिधी

नगर लोकसभा मतदारसंघाच्या हायव्होल्टेज लढतीकडे केवळ जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे लक्ष लागून आहे. भाजपाच्या वतीने महायुतीचे विद्यमान खासदार डॉ. सुजय विखे व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून महाविकास आघाडीचे नीलेश लंके यांच्यामध्ये अटीतटीची लढत झाली. एमआयएमने माघार घेतल्याने मतविभागणी करणारा कोणताही तिसरा घटक यंदा मतदारसंघात कार्यरत नव्हता. तरीही पंतप्रधान मोदींची सभा, त्यांनी चर्चेत आणलेला कसाबचा मुद्दा आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या कांदा-शेतीचे प्रश्न यातून होणारे ध्रुवीकरण नगरचा कौल स्पष्ट करणार आहे.

लोकसभा निवडणूकीला प्रत्यक्षात सुरुवात झाल्यानंतर पहिल्या टप्प्यात ही निवडणूक खा.विखें यांच्याकडून मोदींच्या काळात झालेला विकास तर लंके यांच्याकडून स्थानिक प्रश्नांभोवती फिरू लागली. पंतप्रधाननरेंद्र मोदीयांच्या सभेला झालेली लक्षणीय गर्दी आणि मोदी यांनी भाषणात आणलेल्या कसाबच्या मुद्द्याने मतांचे ध्रुवीकरण निर्माण झाले. कांदा निर्यातबंदी, दूधदर असे काही ग्रामीण जीवनाशी निगडित मुद्दे प्रभावी ठरले, तर मोदींबाबतचे वलय शहरी भागात महत्त्वाचे ठरले. समाजमाध्यमाचा आधार घेत दोन्ही बाजूंनी वैयक्तिक टीकाटिप्पणीवर भर दिला गेला होता.

धनगर समाजाची मते प्रभावी ठरणारे राज्यात जे मतदारसंघ आहेत, त्यात नगरचा समावेश होतो. हे ओळखूनच दोन्ही बाजूंनी त्यावर भर दिला गेला. हा मोह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाही टाळता आला नाही. त्यामुळे विखेंच्या बाजूने अहिल्यानगर नामांतर आणि विरुद्ध बाजूने रखडलेले धनगर समाज आरक्षण यावर प्रचारात भर राहिला. दोन्ही प्रमुख उमेदवार मराठा समाजाचे असल्याने मराठा आरक्षणाचा मुद्दा क्षीण झाला होता.

ही निवडणूक महायुती विरुद्ध महाविकास आघाडीतील दोन उमेदवारापेक्षा पवार विरुद्ध विखे या दोन पारंपरिक विरोधकांत रंगली. पवार व विखे या दोघांच्या भाषणाचा रोख, आरोप-प्रत्यारोप त्या दृष्टीनेच रंगले. याशिवाय काँग्रेसचे नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी त्यांची संगमनेरमधील वैयक्तिक प्रचार यंत्रणा यंदा प्रथमच विखे यांच्याविरोधात थेटपणे नगर मतदारसंघात दाखल केली होती. त्यामुळे यंदाच्या नगरमधील निवडणुकीत विखे विरुद्ध पवार-थोरात असा निकराचा लढा पाहावयास मिळाला. त्यातच ऐनवेळी आपल्या गटाला राम राम करत पवार गटाची उमेदवारी घेणाऱ्या लंकेंविरुद्ध अजित पवारांनी घेतलेली सभा हादेखील मुद्दा या निवडणुकीत महत्त्वाचा ठरला.

गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदानात २.३३ टक्के वाढ होऊन एकूण ६६.६१ टक्के मतदान झाले. हा वाढलेला टक्का कोणाच्या पथ्यावर पडला, याचे औत्सुक्य मतमोजणीतून स्पष्ट होणार आहे. या टक्कावाढीत मुस्लीम समाजाचा किती हातभार लागला, हेहीनिकालातून स्पष्ट होईल.

समर्थकांच्या लाखोंच्या पैजा

१३ मे ला झालेल्या मतदानानंतर विखे व लंके समर्थक विजयाचे दावे प्रतिदावे करीत आहे. समाजमाध्यमांवर याचे प्रतिबिंब उमटत आहे.कोण निवडून येणार येथपासून तर कुणाला किती मताधिक्य मिळणार यावर वादविवाद सुरू असून समर्थकांनी लाखांच्या पैजा टाकल्या आहे. ऑनलाईन पाठविलेल्या पेमेंटचे स्क्रिनशॉटही सोशल मीडियावर झळकत आहेत.

तुमच्याकडे कोणाची हवा ?

मतमोजणीला (४ जून) काही दिवसांचाच अवधी राहिला असल्याने कार्यकर्ते, समर्थकांची धाकधूक वाढली आहे.प्रत्येकजण वेगवेगळ्या विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते, मित्रपरिवार तसेच नातेवाईकांना तुमच्याकडे कोणाची हवा ? अशी विचारणा करीत निवडणूकीच्या निकालाचा अंदाज बांधत आहेत.

नगर अर्बन बँक घोटाळा : कर्जदार अक्षय लुणावत अटकेत

■ उपअधीक्षकांच्या पथकाने पुण्यातून घेतले ताब्यात
■ १ जूनपर्यंत पोलिस कोठडी

नगर : प्रतिनिधी

नगर अर्बन मल्टिस्टेट बँकेच्या २९१ कोटींच्या घोटाळ्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने आणखी एका कर्जदाराला अटक केली आहे. अक्षय राजेंद्र लुणावत (वय ३४, रा. उंड्री, पुणे) असे या कर्जदाराचे नाव आहे. उपअधीक्षक अमोल भारती यांच्या पथकाने पुण्यातील राहत्या घरातून त्याला ताब्यात घेतले. लुणावत याच्या खात्यातून संचालक नवनीत सुरपुरीया, डॉ. नीलेश शेळकेच्या खात्यात रकमा वर्ग झाल्याचे समोर आले आहे. तसेच, त्याच्याकडे ८ कोटींपेक्षा अधिक थकबाकी आहे. दरम्यान, न्यायालयाने त्याला १ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

अक्षय लुणावत हा कल्पद्रुमा ज्वेलर्सचा संचालक असून, त्याच्या नावावर ८ कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे. त्याने बँक अधिकारी, पदाधिकारी व संचालकांशी संगनमत करुन कल्पद्रुमा ज्वेल्स ॲण्ड जेम्स या कंपनीच्या नावे बनावट कागदपत्रांच्या आधारे तारण मालमत्तेचे वाढीव मुल्यांकन दर्शवून वेळोवेळी मोठ्या रकमांचे कर्ज घेतले. या कर्ज रकमेचा गैरवापर केला व कर्ज रकमेची परतफेड केलेली नाही. या कर्ज रकमेच्या वापराबाबत तपास करून रक्कम हस्तगत करायची आहे.

लुणावत याच्या खात्यातून नगर अर्बन बँकेचे संचालक नवनीत सुरपुरीया, डॉ. नीलेश शेळके व इतरांच्या खात्यावर वेळोवेळी रकमा वर्ग करण्यात आल्या आहेत. या रकमा बनावट कागदपत्राच्या आधारे घेतलेल्या कर्जापोटी त्याने संचालकांना दिल्या असण्याची शक्यता आहे. याचा तपास करण्यासाठी ७ दिवस पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली.

कर्ज फेडण्यासाठी टेरासॉफ्टच्या खात्यातून वर्ग रकमेचा वापर लुणावत याने २०१५ मध्ये घेतलेल्या उर्वरीत पान ३ वर

जागांवर उमेदवारांची निवड चुकली? धाकधूक वाढली!

■ महायुतीचे प्रयोग फसण्याची भीती ■ मतदारराजा कोणाला कौल देणार ?

मुंबई: प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीचा निकाल अवघ्या काही दिवसांवर आला आहे. गेल्या साडे चार वर्षांमध्ये राज्याच्या राजकारणात घडलेल्या घडामोडी, फुटलेले पक्ष, विचित्र आघाड्या-युत्यांचे राजकारण पाहता मतदारराजा कोणाला कौल देणार याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. निकाल अवघ्या काही दिवसांवर आलेला असताना आता महायुतीची धाकधूक वाढली आहे. राज्यात महायुतीने ४५ जागा जिंकण्याचे लक्ष ठेवले होते.

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जूनला लागेल. संभाव्य निकालाची चर्चा भाजपमध्ये सुरु झाली असून नेमक्या काय चुका झाल्या त्याबद्दल आत्मचिंतन सुरु आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा करिश्मा असल्याने कोणताही उमेदवार दिला तरी निवडून येणारच हे गृहितक चुकीचे ठरणार नाही ना, अशी शंका भाजपला आहे. भाजप आणि शिंदेसेनेने किमान ८ ते १० जागांवर वेगळे उमेदवार दिले असते, तर फायदा झाला असता असा एक मतप्रवाह महायुतीत आहे.
सामान्य मतदारवर्गात नाराजी असलेल्या खासदारांनाच तिकीट दिल्याचा फटका विशेषत: विदर्भात बसू शकतो. वर्धा, गडचिरोली, भंडारा-गोंदियात नवीन चेहऱ्यांना संधी दिली गेली असती, तर खासदारांबद्दलच्या अँटी इन्कम्बन्सीचा फटका टाळता आला असता, असे विदर्भातील पक्ष संघटनेत काम करणाऱ्या काहींनी सांगितले. उमेदवारांबद्दल नाराजी असली तरीही मोदींची सुप्त लाट होती. त्याच लाटेच्या आधारे उमेदवार तरुन जातील. मतदारांनी मोदींकडे पाहून मतदान केलंय, असा दावा भाजपचे नेते करतात.

शिंदेसेनेला कुठे कुठे फटका?

शिंदेसेनेला बुलढाणा, दक्षिण मुंबई, नाशिक, शिर्डीमध्ये प्रामुख्यानं फटका बसू शकतो. बुलढाण्यात अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर किती मतं घेतात, त्यावर शिंदेसेनेच्या प्रतापराव जाधवांचा जय-पराजय अवलंबून आहे. दक्षिण मुंबईची जागा भाजपने लढवली असती, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर किंवा मंत्री मंगलप्रभात लोढा यांना तिकीट दिले असते तर नक्कीच विजय मिळाला असता, असे भाजपच्या स्थानिक नेत्यांना वाटतं. दक्षिण मुंबईत यामिनी जाधवांची उमेदवारी उशिरा जाहीर झाली. हा मुद्दा त्यांच्या विरोधात जाऊ शकतो.

महायुतीचे प्रयोग फसणार?

धाराशिवमध्ये भाजपचे आमदार राणा जगजितसिंह यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना अजित पवार गटाची, हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील यांच्या पत्नी राजश्री यांना यवतमाळ-वाशिममधून उमेदवारी देणं, रासपच्या महादेव जानकरांना अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या कोट्यातून परभणीतून तिकीट देणं, शिरुरमध्ये आढळराव पाटील यांना सेनेतून आयात करुन घड्याळावर उमेदवारी देणं हे प्रयोग यशस्वी होतील का, असे प्रश्न आता महायुतीच्या नेत्यांना पडले आहेत.

महायुती, मविआचे दावे काय?

पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्यात मराठा, मुस्लिम, दलित असं समीकरण महाविकास आघाडीसोबत होते. तर विदर्भात दलित, मुस्लिम, कुणबी (डीएमके) मतदारांनी आपल्याला साथ दिली, असं मविआचे नेते सांगत आहेत. तर दुसरीकडे मराठा आणि कुणबी समाज आमच्यासोबतही होता आणि लहान-मोठ्या अन्य जातींनीदेखील आम्हाला साथ दिली, असा दावा भाजपच्या नेत्यांचा आहे.

वाशिम जिल्ह्यात ऊस -कांद्याच्या ट्रकचा भीषण अपघात

समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच

वाशिम :प्रतिनिधी

जलद प्रवास होण्याच्या दृष्टीने बनविण्यात आलेल्या समृद्धी महामार्गावर दिवसेंदिवस अपघातांची मालिका वाढत चालली आहे. गाडीचा टायर फुटणे, जंगली प्राणी आडवे येणे, चालकाला झोपेची डूलकी येणे. तर महामार्गावर उभ्या वाहनाला मागून येणाऱ्या वाहनाची धडक लागणे, अश्या आणि इतर कारणाने समृद्धी महामार्गावर अपघात घडत आहेत. असाच एक अपघात बुधवारी, २९ मे रोजी सकाळी वाशिम जिल्ह्याच्या हद्दीत घडला.

कारंजा तालुक्यातील पोहा गावाच्या जवळ उस घेऊन जाणारा एम. एच. १६ बी.सी. ८१७४ क्रमांकाचा ट्रक उभा होता. या उभ्या ट्रकला मागून कांदा घेऊन येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. अपघात एवढा भीषण होता की मागून येणाऱ्या ट्रकच्या केबिनचा अक्षरशः चुराडा झाला. दरम्यान चालक आणि त्याचा सहकारी केबिन मध्ये फसले होते. यामध्ये चालकाचा मृत्यू झाला.

योगेश निवृत्ती खैनार वय ३९ रा. लासनगाव जिल्हा नाशिक असे मृतकाचे नाव आहे. तर त्याचा सहकारी प्रदिपसिंग जसवंतसिंग मान वय ३५ वर्ष हा या घटनेत जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच समृद्धी महामार्गावरील १०८ रुग्णवाहिका श्री गुरु मंदिर रुग्णवाहिका, अग्निशमन दल, महामार्ग पोलिस तसेच कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस घटनास्थळी दाखल होऊन त्यांनी बचावकार्यास सुरूवात केली.

अपघात एवढा भीषण होता की, मागून धडक देणारा ट्रकच्या केबिनचा चुराडा होऊन तो समोरच्या उभ्या ट्रक मधील केबिनमध्ये फसला होता. त्यामुळे जेसीबीच्या साहाय्याने ट्रकला बाजूला करण्यात आले. ट्रकच्या केबिनचा चुराडा झाल्याने ट्रकमध्ये फसलेल्या दोघांना बाहेर काढण्यासाठी अथक प्रयत्न करावे लागले. बऱ्याच वेळानंतर केबिनमध्ये फसलेल्या व्यक्तींना उर्वरीत पान ३ वर

फॅशन | संसार | सौंदर्य
सखी

डाग, रुक्षपणा कमी करेल चंदन फेस पॅक

चंदनमधील गुणधर्मांमुळे त्वचेचा कोरडेपणा दूर होतो. नियमित स्वरुपात चेहऱ्यावर चंदन पॅक लावा आणि सुकल्यानंतर थंड पाण्यानं चेहरा स्वच्छ धुऊन घ्या. या फेस पॅकमुळे तुमच्या चेहऱ्यावर चमक येईल आणि काळे डाग देखील दूर होतील. चेहऱ्यावर नैसर्गिक तेज येण्यासाठी चंदनाचा फार पूर्वीपासून वापर केला जातो. ब्युटी केअर रुटीनमधील हा आयुर्वेदिक उपाय आहे. चंदनमध्ये जास्त प्रमाणात औषधी गुणधर्माचा साठा आहे. यातील घटकांमुळे त्वचेवरील डाग, मुरुम आणि त्वचेचा रुक्षपणा कमी होतो. यामुळेच आयुर्वेदामध्ये चंदनला भरपूर महत्त्व आहे. हिवाळ्यामध्ये काही लोक अंगावर चंदन लेप लावून आंघोळ करतात. यामध्ये अँटी बॅक्टेरिअल गुणधर्म आहेत. ज्यामुळे त्वचेशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळते. चंदन आणि दूध एकत्र करून चेहऱ्यावर लावल्यास त्वचा उजळण्यास मदत मिळते. कडक उन्हामुळे त्वचेचं भरपूर नुकसान होतं. उन्हामुळे त्वचेवरील डाग कमी करण्यासाठी चंदन पावडरचा वापर करावा. चंदनामुळे मुरुम, डाग, डार्क सर्कल यासारख्या त्वचेच्या समस्या कमी होतात.

त्वचेच्या समस्या

धावपळीचे आयुष्य, अपुरी झोप, ताणतणाव इत्यादी गोष्टींमुळे त्वचेच्या समस्या निर्माण होतात. या समस्यांपासून दूर राहण्यासाठी चंदन फेस पॅकचा वापर करून पाहा. चंदनाचे तेल देखील त्वचेसाठी लाभदायक असतं. चेहऱ्याचे डाग कमी करण्यासाठी एक चमचा चंदन पावडरमध्ये एक चमचा दूध आणि चिमूटभर हळद मिक्स करून फेस पॅक तयार करा. हे मास्क आपल्या चेहऱ्यावर २० मिनिटांसाठी लावून ठेवा आणि यानंतर चेहरा थंड पाण्याने धुऊन घ्या.

त्वचा हायड्रेट

त्वचा हायड्रेट नसल्याच्या कारणामुळे कोरडी होऊ लागते. यामुळे त्वचेच्या समस्या निर्माण होऊ लागतात. चंदनमध्ये नैसर्गिक स्वरुपात असणारे तेल त्वचेचा कोरडेपणा कमी करतात. एक चमचा चंदन पावडरमध्ये दोन चमचे गुलाब पाणी मिक्स करून जाडसर पेस्ट तयार करा. ही पेस्ट कापसाच्या मदतीनं चेहऱ्यावर लावा आणि सुकल्यानंतर थंड पाण्याने चेहरा धुऊन घ्या.

- सन टॅन कमी होतं : सन टॅनिंग कमी करण्यासाठी चंदन फेसपॅक फायदेशीर आहे. एक चमचा संत्र्याच्या पावडरमध्ये एक चमचा चंदन आणि दोन चमचे दही मिक्स करा. जाडसर पेस्ट तयार करा. १५ मिनिटांसाठी हे मास्क चेहऱ्यावर लावा. यानंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ धुऊन घ्या. या मास्कमुळे त्वचेवर नैसर्गिक चमक येईल आणि काळे डाग देखील हळूहळू कमी होतील.
- शरीरावरील सूज कमी होते : चंदनमुळे शरीरावर आलेली सूज कमी होते. चेहऱ्यावरील मुरुमांचा त्रास, मुरुमांमुळे होणारा दाह कमी होतो. मुरुम आणि चेहऱ्यावरील सूज कमी करण्यासाठी एक चमचा धणे पावडर, एक चमचा चंदन आणि दोन चमचा दही एकत्र घ्या आणि मिक्स करा. ही पेस्ट चेहऱ्यावर १५ मिनिटांसाठी चेहऱ्यावर लावा. या फेस मास्कमुळे त्वचेवरील मुरुम कमी होतील. चंदनमुळे त्वचेला थंडावा मिळतो. हे मास्क नियमित लावल्यास त्वचा हायड्रेट राहील.
- एस्ट्रिंजेंटप्रमाणे करते काम : चंदनमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीनचा समावेश आहे. हे घटक तुमची त्वचा खोलवर स्वच्छ करतात. त्वचा मऊ ठेवण्याचं कार्य करतात. रोमछिद्रांमधील दुर्गंध स्वच्छ करतात. कोणत्याही फेस मास्कमध्ये तुम्ही चंदनाचा उपयोग करू शकता. चंदनामध्ये अँटी सेप्टिक गुणधर्म आहेत. जे काही मुरुम आणि दुखापत भरून काढण्याचे काम करतात. चेहऱ्यावर जमा झालेली धूळ, माती स्वच्छ करण्याचे काम चंदनमधील घटक करतात.

त्वचेसाठी चंदन तेलाचे 6 फायदे

चंदनाचे तेल जगभरातील सौंदर्य उत्पादनांमध्ये वापरले जाते. त्वचेसाठी चंदन किती फायदेशीर आहे हे आपल्यापैकी अनेकांनी आजी-आजोबांकडून ऐकले असेलच. विशेषतः मुरुमांसाठी. पण तुम्हाला माहित आहे का की चंदनाचा वापर केवळ मुरुमांपासून सुटका करण्यासाठीच नाही तर त्वचेच्या अनेक समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी केला जातो. चला तर मग जाणून घेऊया त्वचेसाठी चंदनाच्या तेलाचे फायदे...

- पिंपल्स आणि काळे डाग काढून टाकते : चंदन तेल पिंपल्स आणि त्यांच्यामुळे होणारी जळजळ शांत करते. यासाठी चंदनाच्या तेलात हळद आणि कापूर मिसळा. आता हे पिंपल्सवर लावा आणि रात्रभर राहू द्या. सकाळी पाण्याने स्वच्छ धुवा. तुम्हाला यामुळे नक्कीच फरक मिळेल.
- चंदन एक्जिमावर उपचार करते : एक्जिमापासून मुक्त होण्यासाठी, तुम्हाला त्या भागावर चंदनाच्या तेलाचे १ ते २ थेंब टाकावे लागतील. यामुळे तुम्हाला काही दिवसांत फरक जाणवेल.
- त्वचेवरील डाग दूर होतात : चंदनाच्या वापराने चेहऱ्यावरील डाग किंवा जखमाही नाहीशा होतात आणि त्वचा मुलायम होते. जर तुम्हाला यासाठी चंदनाचे तेल सापडत नसेल तर तुम्ही चंदन पावडरदेखील वापरू शकता. तुम्हाला फक्त तुमच्या त्वचेनुसार यात तेल मिक्स करायचे आहे आणि ते किमान १२ तास तसंच ठेवून द्यायचं आहे. त्यानंतर चेहऱ्यावर या तेलाने मसाज करा आणि काही मिनिटे राहू द्या. नंतर पाण्याने स्वच्छ धुवा.
- घामोळ्याची समस्या दूर होते : चंदन थंडगार आहे. त्यामुळे ते त्वचेवर लावल्याने थंडी आणि आराम मिळतो. जर तुम्हीही उन्हाळ्यात घामोळ्याने हैराण असाल, तर चंदनाची पेस्ट त्वचेवर लावा. अगदी लहान मुलांनाही तुम्ही हे लावू शकता.
- अँटी-टॅनिंग गुणधर्म असतात : चंदनाचे तेल त्वचेच्या टॅनिंगपासून मुक्त होण्यास देखील मदत करते. यासाठी मध, लिंबाचा रस आणि दह्यात चंदनाचे तेल किंवा पावडर मिसळून पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट चेहऱ्यावर लावा आणि १५ ते २० मिनिटे राहू द्या. कोरडे झाल्यावर पाण्याने स्वच्छ धुवा
- एंटी-एजिंग गुणधर्म असतात : चंदनाचे तेल त्वचा सैल होऊ देत नाही. हे अँटी-ऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे आणि फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानाशी लढते. ज्यामुळे सुरकुत्या पडत नाहीत. यासाठी चंदनाच्या तेलात मध आणि अंड्यातील पिवळ बलक मिसळावे लागेल. हे मिश्रण २० मिनिटे चेहऱ्यावर लावा आणि नंतर पाण्याने धुवा.



सौंदर्य खुलवणारी मुलतानी माती!

आपल्या चेहऱ्याची त्वचा नितळ आणि मुलायम असावी यासाठी अनेकजण प्रयत्नशील असतात. विशेषतः मुलींमध्ये चेहरा चांगला दिसावा यासाठी विशेष प्रयत्न सुरू असलेले दिसतात. कधी चेहऱ्यावर येणारे पुरळ, डाग, कोरडेपणामुळे निघणारी स्कीन यांसारख्या समस्यांमुळे वैताग होतो. मग यावर नेमका कोणता उपाय करावा हे माहित नसल्याने त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पण त्यामुळे ही समस्या आणखी वाढते. काहीजण चेहरा उजळण्यासाठी बाजारात मिळणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांचाही वापर करतात, तर काही जण पार्लरमध्ये जाणे पसंत करतात. पण भारतीय आयुर्वेदातील घटक असलेली मुलतानी माती चेहरा उजळण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते. तसेच चेहऱ्याचा कोरडेपणा दूर करण्यासाठीही या मातीचा लेप फायदेशीर ठरतो. चेहरा कोरडा पडणाऱ्यांसाठी या टिप्स नक्कीच उपयुक्त ठरतात. बाजारात ही मुलतानी माती सहज उपलब्धही होते. पाहूया या मुलतानी मातीचा नेमका कसा उपयोग केल्यास त्याचा फायदा होतो...

- मध आणि मुलतानी माती : मध हाही एक उत्तम आयुर्वेदीक पदार्थ असून तो आरोग्याच्या विविध समस्यांसाठी फायदेशीर असतो. १ चमचा मधात एक चमचा मुलतानी माती एकत्र करा. हा लेप चेहऱ्याला एकसारखा लावून तो २० मिनिटांसाठी ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. मग चेहऱ्याला एखादे मॉईश्चरायजर लावा. चेहऱ्याचा कोरडेपणा दूर होण्यासाठी हा प्रयोग आठवड्यातून एकदा करा.
- चंदन पावडर आणि मुलतानी माती : एक चमचा मुलतानी मातीमध्ये १ ते २ थेंब गुलाबपाणी घाला. त्यात अर्धा चमचा चंदन पावडर घाला. हे मिश्रण योग्य पद्धतीने एकत्र करुन ते चेहऱ्याला लावा. हा लेप २० मिनिटे ठेऊन कोमट पाण्याने चेहरा धुवा. चेहरा उजळ होण्यासाठी ही प्रक्रिया आठवड्यातून २ वेळा करावी.
- दही आणि मुलतानी माती : एक चमचा दही आणि एक चमचा मुलतानी माती एकत्र करा. हा लेप चेहऱ्यावर लावून तो पूर्णपणे वाळू द्या. मग कोमट पाण्याने चेहरा धुवा. दह्यातील घटक चेहऱ्यासाठी उपयुक्त असतात. हे मिश्रण मुलतानी मातीमध्ये एकत्र केल्याने त्याचा चांगला फायदा होतो.
- हळद आणि मुलतानी माती : हळदीलाही आयुर्वेदात विशेष महत्त्व आहे. पाव चमचा हळद, २ चमचे मध आणि १ चमचा मुलतानी माती एकत्र करा. हे मिश्रण २० मिनिटे चेहऱ्याला लावून ठेवा आणि मग चेहरा पाण्याने धुवा.

मुलतानी मातीसोबत 'ही' गोष्ट वापरा अन्

उन्हाळ्यात मिळवा तजेलदार चेहरा

उन्हाळा आता सुरू झाला असून या दिवसात उष्ण वारे आणि कडक सूर्यप्रकाश त्वचेचा सर्व रंग काढून घेत आहेत. या दिवसांमध्ये उष्णतेचा सर्वाधिक परिणाम चेहऱ्यावर दिसून येत आहे. कडक उन्हामुळे चेहऱ्याला जळजळ, घाम येणे, खाज सुटणे, टॅनिंग अशा समस्या सतावत आहेत. काही वेळ बाहेर फिरल्यानंतर चेहऱ्याला घाम येऊ लागतो आणि चेहरा लाल होऊ लागतो आणि चेहऱ्यावर पुरळ येणे सुरू होते. उन्हाळ्यात चेहरा थंड ठेवण्यासाठी मुलतानी माती आणि पुदिना पॅक प्रभावी आहे.

पॅकमध्ये असलेले पुदिना त्वचेला थंड बनवते आणि त्वचेचा टोन देखील उजळ करते. तुम्ही हा पॅक वापरला तर तुमच्या त्वचेचा टोन एकसमान करतो आणि ब्लॅक हेड्सपासूनही सुटका करतो. डोळ्यांखाली काळी वर्तुळे असतील तर हा पॅक वापरणे फायदेशीर ठरेल. जर तुम्हीही उन्हाळ्यात त्वचेच्या समस्यांनी त्रस्त असाल तर मुलतानी माती आणि पुदिन्याचा पॅक लावा. हा पॅक लावल्याने घाम येणे तर कमी होईलच, सोबतच तुमचा चेहराही मस्त होईल. हा पॅक तुम्ही उन्हाळ्यात घरी बनवू शकता. हा पॅक लावल्याने चेहऱ्यावर ग्लो येईल आणि चेहऱ्याची त्वचा थंड राहील.

त्वचेचे फायदे

मुलतानी माती आणि पुदिना पॅक उष्णतेमध्ये चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल काढून टाकते आणि तेल नियंत्रित करते. हा पॅक लावल्याने तुमच्या त्वचेची होणारी जळजळ आणि उष्णतेपासून आराम मिळतो. तसेच तुम्ही उन्हाळ्यात जास्त उन्हात राहिल्यास हा पॅक वापरा.

पॅक कसा तयार करायचा ?

हा पॅक बनवण्यासाठी एका भांड्यात दोन चमचे मुलतानी माती घ्या. आता पुदिना मिक्सरमध्ये किंवा जाळीवर बारीक करून घ्या. लक्षात ठेवा त्यात जास्त पाणी घालू नका. पुदिन्याची ही पेस्ट मुलतानी मिक्स करून चांगली पेस्ट बनवा. तयार केलेली पेस्ट चेहऱ्यापासून मानेपर्यंत लावा आणि १५ मिनिटे कोरडे होऊ द्या. १५ मिनिटांनी चेहरा थंड पाण्याने धुवा, उन्हाळ्यात चेहरा थंड राहील.

कोंडा, केसगळतीच्या त्रासातून हवीय सुटका?

मुलतानी मातीचे ६ हेअर पॅक!

त्वचा आणि केसांची देखभाल करण्यासाठी 'मुलतानी माती' रामबाण उपाय आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून ब्युटी केअर रूटीनमध्ये याचा वापर केला जात आहे. डाग, मुरुम, त्वचेचा रंग आणि पोत चांगला करण्यासाठी तसंच केसांशी संबंधित समस्या दूर करण्यासाठी मुलतानी माती हा अतिशय प्रभावी उपाय मानला जातो. मुलतानी मातीमध्ये भरपूर प्रमाणात नैसर्गिक गुणधर्मांचा समावेश आहे. यातील पोषक घटकांमुळे केसांवर सकारात्मक परिणाम होतो. या आयुर्वेदिक उपायामुळे केस तुटणे, केसगळती, कोंडा या समस्या कमी होऊन तुमचे केस घनदाट, काळेशार आणि लांबसडक होण्यास मदत मिळू शकते. केसांचं आरोग्य निरोगी राहावं, यासाठी तुम्ही मुलतानी माती हेअर पॅकचा वापर केल्यास फायदेशीर ठरू शकते. यापासून कित्येक पोषण तत्त्वांचा तुमच्या केसांना पुरवठा होईल. निर्जीव केसांचीही समस्या कमी होऊ शकते.

- तुटणाऱ्या केसांची समस्या : केसं तुटणे ही एक सामान्य समस्या आहे आणि यामुळे अनेक जण त्रस्त देखील असतात. केस तुटणे आणि केसगळतीची समस्या कमी करण्यासाठी आठवड्यातून दोन वेळा मुलतानी माती हेअर पॅकचा वापर करा. मुलतानी माती आणि दही एकत्र घ्या आणि त्याचा हेअर पॅक तयार करा. हेअर पॅक चांगल्या पद्धतीनं केसांना लावा. एक तास पॅक केसांवर राहू द्या. यानंतर कोमट पाणी आणि सौम्य स्वरुपातील शॅम्पूनं केस स्वच्छ धुऊन घ्या. हा उपाय केल्यास केसगळतीची समस्या कमी होईल.
- लांबसडक केस : आपले केस लांबसडक आणि घनदाट असावेत, अशी इच्छा प्रत्येक तरुणीची असते. पण धूळ, माती आणि प्रदूषणाचा केसांवर वाईट परिणाम होतो. केसांची योग्य देखभाल न केल्यास त्यांची अवस्था आणखी वाईट होऊ शकते. मुलतानी मातीमुळे केसांना खोलवर पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो. ज्यामुळे केसांची वाढ देखील चांगल्या प्रकारे होते. एका वाटीमध्ये मुलतानी माती आणि रीठा पावडर एकत्र घ्या. यामध्ये आवश्कतेनुसार पाणी मिक्स करा. जाडसर हेअर पॅक तयार करून घ्या. आता केसांना हा पॅक लावा आणि अर्ध्या तासानंतर थंड पाण्यानं केस स्वच्छ धुऊन घ्या. हा उपाय आठवड्यातून तीन वेळा केल्यास केसगळती कमी होईल.

- कोरड्या केसांची समस्या : मऊ केसांसाठी मुलतानी माती, दही आणि तिळाच्या तेलाचा वापर करावा. या तिन्ही सामग्री वाटीमध्ये एकत्र घ्या आणि हेअर पॅक तयार करा. आता हा पॅक टाळू, केस आणि केसांच्या मुळांना लावा. १५ ते २० मिनिटांनंतर केस थंड पाण्यानं स्वच्छ धुऊन घ्या. थोड्या वेळानं केसांना शॅम्पू लावून केस धुऊन घ्या आणि कंडिशनर देखील लावा. शक्यतो केमिकल फ्री शॅम्पूचा वापर करावा. या हेअर पॅकमुळे केसांना भरपूर प्रमाणात पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो. या पॅकमुळे केसांवर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते.
- केसांना मॉइश्चराइझ करण्यासाठी : केसांची चमक वाढवण्यासाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर करा. हे तेल थोडेसे गरम करून घ्या. तेल उकळू नये, केवळ कोमट करावं. आता या तेलानं केसांचा हलक्या हातानं मसाज करावा. यानंतर मुलतानी मातीमध्ये लिंबू रस, एक चमचा मध आणि दह्याचा समावेश करून हेअर पॅक तयार करा. एक तासांनंतर केस थंड पाण्यानं स्वच्छ धुऊन घ्या. या हेअर पॅकमुळे केस मऊ होतात. तसंच केसांमधील नैसर्गिक ओलावा टिकून राहतो.
- तेलकट केसांसाठी हेअर पॅक : मुलतानी मातीमुळे केसांमधील अतिरिक्त तेल कमी होण्यास मदत मिळते. पाण्यामध्ये मुलतानी माती मिक्स करून जाडसर पेस्ट तयार करा. ही पेस्ट केसांना लावा. एक तासानंतर केस पाण्यानं स्वच्छ धुऊन घ्या. या पॅकमुळे तेलकट केसांची समस्या कमी होईल.
- कोंडा कमी करण्यासाठी : सामग्री : मुलतानी माती, मेथी दाण्यांची पावडर, एक चमचा लिंबू रस. मेथीची पावडर रात्रभर भिजत ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी भिजलेली मेथी पावडर, मुलतानी माती आणि एक चमचा लिंबू रस वाटीमध्ये एकत्र घ्या आणि पेस्ट तयार करून घ्या. हा पॅक टाळूवर लावा. हा पॅक केसांच्या मुळांपासून ते केसांच्या टोकांपर्यंत लावायचा आहे, हे लक्षात घ्या. अर्ध्या तासांनंतर केस थंड पाण्यानं स्वच्छ धुऊन घ्या. केसांसाठी केमिकल फ्री शॅम्पूचा वापर करावा. तुम्ही आठवड्यातून एकदा हा उपाय करू शकता. या हेअर पॅकमुळे केसांमध्ये जमा झालेली दुर्गंध बाहेर फेकली जाते. केसांच्या वाढीसाठी आपल्या टाळूवरील त्वचा निरोगी असणं आवश्यक आहे.

शॉर्ट न्यूज

शेअर मार्केटचा शेवगावात पहिला बळी

■ **शेवगाव :** शेअर व्यवसायात स्वतः ला संपवण्याचे सत्र सुरू झाले असून, हसनापूर येथील या व्यवसायात मध्यस्थी असणार्या एका युवकाने तगाद्याला कंटाळून स्वतः चे जीवन संपवल्याची घटना घडली. शेअर व्यवसायात काही महाराज सहभागी असल्याचे समजल्याने आश्चर्य व्यक्त होत असून, हे महाराज संपर्काबाहेर गेल्याची जोरदार चर्चा चालू आहे. दरम्यान, पळून गेलेल्या शेअर व्यावसायिकांवर गुन्हा दाखल करण्यास गुंतवणूकदार पुढे आले असताना पोलिस मात्र वेगवेगळे कारण सांगून गुन्हा दाखल करण्याबाबत टाळाटाळ करीत आहेत.

आगसखांड फाटा येथे अपघातात एक ठार

■ **पाथर्डी :** तालुक्यातील आगसखांड फाटा येथे राष्ट्रीय महामार्गावर अपघात होऊन दुचाकीवरील वडील जागीच ठार झाले. तर मुलगा गंभीर जखमी झाला आहे. रोहिदास माधव वनवे (वय ५२) असे ठार झालेल्या वडिलांचे नाव आहे. तर मुलगा अविनाश रोहिदास वनवे हा गंभीर जखमी झाल्याने त्याला खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी हलवण्यात आले आहे. तर मयत रोहिदास वनवे यांचा लहान मुलगा अशोक रोहिदास वनवे हा सोमवारी अपघात होण्यापूर्वी बारामती ऍग्रो या कारखान्याहून आपल्या खडकवाडी मूळ गावी येत असताना त्याचाही रस्त्यामध्ये अपघात झाला.

हक्काच्या पाण्यावर गदा येणार नाही

■ **अकोले :** तालुक्यासाठी अपेक्षित पाणी निळवंडे व भंडारदरा धरणामध्ये राखीव ठेवावे, या प्रमुख मागणीसाठी सर्वपक्षीय कार्यकर्ते व अकोले तालुका पाणी हक्क संघर्ष समितीच्यावतीने निळवंडे धरणावर आंदोलन पुकारण्यात आले होते. प्रशासनाने याची दखल घेऊन ७०० एम. सी. एफ. टी. ची दोन आवर्तने होतील इतके पाणी निळवंडे व भंडारदरा धरणात राखीव ठेवले जाईल, ही मागणी मान्य केली. अकोले तालुक्याचे शेतकरी, लोकप्रतिनिधी व सर्वपक्षीय कार्यकर्ते यांना विश्वासात न घेता आचारसंहितेच्या अडून निळवंडे व भंडारदरा जलाशयातून अमर्याद पाणी वाहून नेले जात होते.

नेवासात ५५७० विद्यार्थी दहावीत उत्तीर्ण

■ **नेवासा :** महाराष्ट्र राज्य माध्य व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळाचा दहावीचा ऑनलाईन निकाल सोमवारी जाहीर झाला असून यात नेवासा तालुक्याचा निकाल ९५. ७३ इतका लागला आहे. तालुक्यातील ५८६१ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज भरले होते. पैकी ५८१८परीक्षेस प्रविष्ठ झाले. ५५७० विद्यार्थी उत्तीर्ण होवून निकाल ९५. ७३ टक्के लागला. उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये २४०९ विद्यार्थी विशेष (डिस्टींक्शन) उत्तीर्ण झाले. २०३९ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवली. ९६० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. तर १६२ विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

अहमदनगर शहराचा स्थापना दिवस साजरा

■ **नगर :** सामाजिक सलोखा व धार्मिक ऐक्याचा संदेश देत ऐतिहासिक अहमदनगर शहराचा ५३४ वा स्थापना दिवस मंगळवारी (२८ मे) उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व धर्मिय धर्मगुरुंच्या उपस्थितीमध्ये जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्या हस्ते शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा येथील कबरीवर चादर अर्पण करण्यात आली. मराठी पत्रकार परिषद, हाजी अजीजभाई चष्मावाला सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी भक्तीगीत, कविता, देशभक्तीवरील गीत, शायरी व मुशायराने बागरोजा येथे मैफल रंगली होती.

लोकमाता अहिल्याबाई होळकर : कार्य आणि इतिहास

जयंती विशेष

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव ,अस्पृश्यता उच्चाटन ,सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांना विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क ,प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या छोट्याशा खेड्यात धनगर समाजातील माणकोजी व सुशीलाबाई शिंदे यांच्या पोटी झाला.

माणकोजी शिंदे हे सर्वसामान्य परिस्थितीतील असून देखील ते विद्वान व दूरदर्शी गृहस्थ होते.अठराव्या शतकामध्ये आजच्या सारखी शिक्षणाची साधने उपलब्ध नसताना देखील त्यांनी अहिल्येला शिक्षणाची घरीच व्यवस्था केली. अहिल्या मातेचे जीवन घडविण्यात त्यांचा फार मोलाचा वाटा होता.अवघ्या आठ वर्षाची असतानाच होळकर घराण्याचे संस्थापक राजर्षी मल्हाररराव होळकरांचा बारा वर्षाचा एकुलता एक शूरवीर मुलगा खंडेराव यांच्याशी अहिल्याचा विवाह २० मे १७३३ रोजी पुण्यातील शनिवारवाडा येथे झाला.

लग्नानंतर लगेच आपल्या चतुर ,क्षमाशील व शांत स्वभावाने त्यांनी कुटुंबातील सर्वांची मने जिंकून घेतली. त्यांना मालेराव व मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. दूरदृष्टी ठेवून मल्हाररावांनी देखील पुरुषप्रधान संस्कृतीच्या काळातही सुनेला तत्कालीन दरबाराची मोडी मराठी लिहिणे,वाचणे, गणित इत्यादी गोष्टी शिकवल्या. तसेच घोड्यावर बसणे,दांडपट्टा फिरवणे, युद्धाचे व राजकारणाचे डावपेच आखणे,लढाया करणे,पत्रव्यवहार करणे न्यायनिवाडा करणे इत्यादी प्रशिक्षण दिले. परिणामी अहिल्येची सामाजिक व राजकीय बुद्धी परिपक्व झाली.

इ.स. १७५४ मध्ये कुंभेरीच्या लढाईत अहिल्याचा शूरवीर पती खंडेराव यांना वीरमरण आले. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी वैधव्य आले असताना जुन्या रूढी परंपरेनुसार सती जाण्याचे नाकारून त्यांनी पुरोगामित्वाचा परिचय दिला. सती न जाणे म्हणजे आयुष्यभर लोकनिंदा व चारित्र्यावर शिंतोडे हे माहिती असूनही सती जाणे तहकूब करण्यात अहिल्याबाईनी जे मनोधैर्य दाखवले ते अद्वितीय आहे. आपण सती गेलो तर स्वर्ग मिळेल किंवा नाही कोण जाणे. परंतु जगलो तर लाखो प्रजाजनांना सुख देता येईल असा विचार करून अहिल्याबाईने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला व धर्म ,रूढी ,परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे माणून रयतेला कल्याणकारी राज्य दिले.

मल्हारराव होळकरांच्या मृत्यूनंतर २९ वर्षे अत्यंत यशस्वीपणे खऱ्या कल्याणकारी योजना काय असू शकतात आणि त्या कशा राबवल्या जाव्यात हे त्यांनी दाखवून दिले. सासरा मल्हाररावांचा मृत्यू २० मे १७६६, मुलगा मालेरावांचा मृत्यू २७ मार्च १७६७ मध्ये झाला. अशी एकामागून एक दुःखे येत असतानाही अत्यंत धीराने आपली प्रजा सुखी,समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहिल्याबाईनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता ,समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

पेशवा रघुनाथराव याला होळकरांच्या राज्याचा व दौलतीचा लोभ सुटला. त्याने पेशवाईत होळकरांचे राज्य विलीन करण्यासाठी पन्नास हजारांची फौज घेऊन इंदोर वर चढाई केली. हे वृत्त तेजस्विनी अहिल्याबाईला कळताच खचून न जाता त्यांनी रघुनाथरावांना खलिता पाठविला त्या म्हणतात,''आपण माझे राज्य हिरावून घेण्याचे कपट रचून आलात आमच्याकडील फितूरास गाठले. मला दुबळी समजलात की खुळी? दुःखात बुडालेल्यास आधिक बुडवावे हा तुमचा दुष्ट हेतू? आता आपली गाठ रणांगणात पडेल! माझ्याबरोबर युद्धात पारंगत असणाऱ्या स्त्रियांची फौज असेल मी हरले तर कीर्ती करून जाईल. पण आपण हरलात तर आपल्याला तोंड दाखवायला जागा उरणार नाही. म्हणून लढाईच्या भरीस न पडाल तर बरे. मी अबला आहे असे समजू नका. मी खांद्यावर भाले घेऊन समोर उभे राहिले तर पेशव्यांना भारी पडेल. वेळ पडली तर हत्तीच्या पायी साखळीशी बांधून तुमचे स्वागत न केले तर होळकरांच्या सुनेचे नाव लावणार नाही.'' मुत्सद्दी अहिल्या म्हणजे तळपती समशेर आणि लखलखती वीज होती. त्यांनी आपल्या आयुष्य लोककल्याणकारी कार्यासाठी वेचत असताना प्रदेशाची मर्यादा न घालता संपूर्ण भारतात कार्य केलेले आहे. संपूर्ण भारतात अनेक विहिरी ,तलाव ,कुंड, घाट बांधले आहेत. रस्ते,पूल निर्माण केले आहेत. जे काम भारताच्या शासन व्यवस्थेत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केले जाते ते काम लोकमाता अहिल्याबाईनी केले. उद्योगधंद्यांना व त्याच्या विकासाला प्राधान्य दिले.

मल्हाररावांच्या मृत्यूनंतर इंदोर वरून संस्थानाची राजधानी महेश्वर या ठिकाणी आणून कारागीर ,मजूर, विणकर, कलावंत ,साहित्यिक अशा गुणी लोकांच्या विकासासाठी जमीन, पैसा, घर इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या. आजही महेश्वरी साड्या, पैठणी, धोतर प्रसिद्ध आहेत. राज्यात पशुपक्षी यांना चरण्यासाठी त्यांनी कुरणे राखली.मुंग्यांना साखर, माश्यांना कणकेचा गोळा, उन्हाळ्यात वाटसरूंना पिण्यासाठी पाणपोया, हिवाळ्यात गरजूंना गरम कपडे यांची सोय केली. आपल्या राज्यात सूक्ष्म जीवही उपाशी राहू नयेत यासाठी दक्षता घेतली. दिव्यांग, अनाथ व असहाय्य लोकांचे पुनर्वसन केले. गोरगरिबांसाठी अन्नछत्रे व सदावर्ते चालविली. वस्त्रांचे वाटप केले. प्रवाशांसाठी मार्गावर अरण्यमय प्रदेशातही आंबराई, बगीचे ,वृक्षारोपण विश्रांतीसाठी ओटे व धर्मशाळा बांधल्या. घाट बांधतांना केवळ तज्ञांची मत विचारात न घेता प्रत्यक्ष त्या भागातील स्त्रियांना बोलून घाटाच्या पायऱ्या कशा हव्यात , कपडे धुताना बाळ कुठे ठेवायला सोयीस्कर पडेल, कपडे बदलताना खोल्या कुठे असाव्यात? इतक्या बारीक तपशिलासह घाट बांधून घेतले.

सर्वधर्मसमभावाचा आदर्श मिरवीत मंदिरे ,मशिदी, दर्गे व विहार बांधली. तर काही मंदीरांचा जीर्णोद्धार केला. रस्ते व महारस्ते बांधल्यामुळे पर्यटनाला प्रोत्साहन मिळाले.मजुरांना काम मिळाले व सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन एकात्मता निर्माण झाली. राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त करणाऱ्या यशवंत फणसे या बहादुरा सोबत स्वतःच्या एकुलत्या एक मुलीचा आंतरजातीय विवाह लावून जातीभेदाला तडा दिला. अहिल्याबाई ह्या समाजसुधारक होत्या.त्यांनी धर्मातील रूढी आणि परंपरांचा आंधळेपणाने कधीही स्वीकार केला नाही. त्यांनी एकच धर्म पाळला आणि तो म्हणजे मानवताधर्म. प्रजेवर जास्त करांचा बोजा न लादता राज्याचा कोष समृद्ध केला. स्वतः चा खर्च मर्यादित करून खाजगी उत्पादनाचा उपयोग सुद्धा लोककल्याणासाठी केला. अशी एक ना अनेक विधायक कामे संपूर्ण भारतात केल्यामुळे त्या खऱ्या अर्थाने लोकमाता व राष्ट्रमाता झाल्या. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला व विचाराला विनम्र अभिवादन.!

मांडवे खून प्रकरणातमित्रचनिघाला मारेकरी; आरोपीने दिली खूनाची कबुली

पाथर्डी : प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील मांडवेयेथील खून प्रकरणात मित्रचमारेकरी निघाला आहे. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अमोल नवनाथ आठरे (रा. कौडगावआठरे, ता. पाथर्डी) याला ताब्यात घेतले आहे.

मांडवेयेथे अविनाश बाळू जाधव या युवकाचा रात्री घरी झोपलेला असताना खून झाला होता. या प्रकरणी महेश जाधव यांच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून घेतला होता.

या घटनेचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केला. अविनाश जाधव यांच्याशी वाद असलेल्या व्यक्तींची माहिती पथकाने मिळविली. त्यानुसार पथकाने अमोल आठरेला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्याने खुनाची कबुली दिली. अविनाशने तिसगावयेथे अमोलच्यावडिलांना शिवीगाळ केली होती. त्यामुळे झोपेत असलेल्या अविनाशवर कोयत्याचेवार करत खून केल्याचे अमोलने पथकाला सांगितले. त्यानुसार पथकाने त्याला अटक केली. पथकाने पुढील तपासासाठी अमोलला पाथर्डी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

(पान १ वरून)

नगर अर्बन बँक घोटाळा : कर्जदार अक्षय लुणावत अटकेत

६ कोटी रुपयांच्या कर्जाची परतफेड करण्यासाठी नगर अर्बन बँकेचे कर्जदार टेरासॉफ्ट टेक्नोलॉजी या फर्मच्या नावाने मंजूर कर्जाची रक्कम वापरण्यात आली आहे. टेरासॉफ्ट टेक्नोलॉजीच्या खात्यातून ३ कोटी ५ लाख रुपये माऊली ट्रेडर्स यांच्या मर्चंटस् बँकेतील खात्यात वर्ग केली व तेथून रोख स्वरूपात काढून ती रक्कम नगर अर्बन बँकेत जमा करुन त्याद्वारे त्याचे कर्ज निरंक केल्याचे समोर आले आहे.

वाशिम जिल्ह्यात ऊस -कांद्याच्या ट्रकचा भीषण अपघात

बाहेर काढण्यात यश आले पण यातील एकाचा मृत्यू झाला. तर एक जखमी झालेल्या व्यक्तीवर रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कारंजा ग्रामीण पोलीस करत आहेत.

आरती काळे नगरकर यांना भास्कर पुरस्कार प्रदान

नगर : प्रतिनिधी

येथील ख्यातनाम लावणी सम्राज्ञी व अभिनेत्री आरती काळे याना महाराष्ट्र जर्नलिस्ट फाउंडेशनचा भास्कर पुरस्कार गोवा येथे दीनानाथ मंगेशकर कला अकॅडमी,पणजी येथे प्रदान करण्यात आला यावेळी गोव्याचे माजी मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे ,पद्मश्री विनायक खेडेकर, ना.श्रीपाद नाईक, रमाकांत खलप, माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत, राजतीलक नाईक,पद्मश्री संजय पाटील, नलिनी (दिदी)पोतदार, राजीव लोहार आदी मान्यवर उपस्थित होते.

भास्कर अवॉर्ड हा मानाचा सन्मानाचा पुरस्कार गेली १९ वर्षे पासून गोवा मध्ये दिला जातो, सांस्कृतिक व व विविध क्षेत्रातील कलावंतांना हा दिला जातो त्यासाठी विविध क्षेत्रातील नामवंत,गुणवंत निवडले जातात व त्यांना पुरस्कार दिला जातो, यावेळी अनेक मान्यवरांनी आरती काळे यांच्या कार्याचा गौरव केला यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली तर संयोजकांनी पुरस्काराबद्दल माहिती दिली.

आरती काळे,नगरकर या लावणी सम्राज्ञी व अभिनेत्री आहेत त्याचे कथक व भरत नाट्यम हे शास्त्रीय शिक्षण झालेले त्यांनी महाराष्ट्र मंडळ(दुबई) मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम,जपान,इंडोनेशिया,रशिया,आदी ठिकाणी आंतरराष्ट्रीय कार्यक्रम सादर केलेले आहे ,त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत तसेच अनेक ठिकाणी त्यांनी कार्यक्रम सादर केले आहेत तसेच चित्रपटात त्यानी काम केले आहे पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेकांनी त्याचे सर्वत्र होत आहे.

मरणानंतरही सरता सरेनात नरकयातना!

■ सुप्याच्या स्मशानभूमीत दुर्गंधींचे साम्राज्य ■ शेजारील पुलही बनला धोकादायक

स्मशानभूमीलगतचा पुल बनला धोकादायक

सुपा बसस्थानकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या सुपा - वाळवणे रस्त्यावर स्मशानभूमीलगत असलेल्या पुलाला मोठे भगदाड पडले आहे. आठ ते दहा महिन्यांपूर्वी तयार करण्यात आलेल्या या पुलाला मोठा खड्डा पडल्यामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे या पुलाचा खड्डा दर्शनी भागात असून अद्याप बांधकाम विभागाला तो दिसत नाही हे विशेष ! यापुलाची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

सुपा प्रवेशद्वाराजवळच घाणीचे साम्राज्य

सुमारे दहा ते बारा गावांची मुख्य बाजारपेठ असलेल्या सुपा शहरात बसस्थानक मेन चौकात वाळवणे रस्त्यावर स्वागत कमान उभारलेली आहे. राज्यात लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या वाळवणे देवस्थानच्या वतीने ही कमान उभारण्यात आली आहे. नगर - पुणे महामार्गावरील सुपा शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेले हे देवस्थान नागरीकांचे श्रद्धास्थान आहे. महामार्गावरून ये- जा करताना भाविक या कमानीचे दर्शन घेतात. मात्र या कमानीजवळ गेले की मोठी दुर्गंधी येते. मग हेच ते का ऐतिहासिक सुपा शहर असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

मरणानंतरही नरकयातना

औद्योगिक वसाहत व वाढते शहरीकरण यामुळे सुपा शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहराची स्मशानभूमी वाळवणे रस्त्यावर चौकापासून हाकेच्या अंतरावर आहे. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर या स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी आणले जाते. मात्र याठिकाणी कोंबड्यांचे कुजलेले मांस ओला व सुका कचरा या पुलावर टाकला जात असल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येते. मरण पावलेला व्यक्ती व अंत्यविधीसाठी आलेल्या सर्वांनाच नाक तोंड दाबून अंत्यविधी होईपर्यंत बसावे लागते.

सुपा : शरद रसाळ

नगर-पुणे महामार्गावरील पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक सुपा शहरात नागरिकांना नाकतोंड दाबून प्रवेश करावा लागत असल्याने महिलांसह नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तर शहराच्या प्रवेशद्वाराजवळच मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने व्यावसायिकांना दुर्गंधाला सामोरे जावे लागत असून सुपा बसस्थानकापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या सुपा स्मशानभूमीत मरणानंतर मृतदेहाला व नागरिकांना नरकयातना सहन कराव्या लागत आहेत.

शहरातील सर्वच रस्ते महामार्गावर कचऱ्यापासुन ते खराब केमिकलपर्यंत तर औद्योगिक कचऱ्यापासुन- ई कचऱ्यापर्यंत सर्वच टाकाऊ पदार्थ फेकून दिले जात आहेत.
यात सुपा वाळवणे रस्त्यालगत शिवेवर खिंडीमध्ये ओला व सुका कचरा पुन्हा दररोज रिचवला जात असल्याने हा रस्ता कचरा डेपो बनला आहे. यामुळे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मनस्ताप सहन कराव्या लागत आहेत.

नगर- पुणे महामार्गावर नगर सुपा ते शिरुर दरम्यान सर्वच ठिकाणी हॉटेल व्यावसायिक, मटन व्यावसायिक, औद्योगिक वसाहतीचे टाकाऊ मटेरीअल व काही केमिकल कंपन्यातील टाकाऊ केमिकल रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला टाकून दिले जाते. यात महामार्गावर काही ठिकाणी म्हणजे सुपा कामरगावच्या सिमेवर, सुपा पवारवाडी घाट, सुपा टोलनाका परीसरात, जातेगाव घाट व बेलवंडी फाटा, गव्हाणवाडी, सुपा वाळवणे रस्ता, सुपा पारनेर रस्ता या ठराविक ठिकाणी तर सरकारी जागा असल्याप्रमाणे कोणीही येतात आणि कचरा टाकून जातात. यांना ना कुणाचा धाक ना कुणाची भिंती हे सर्वच ठिकाणे दोन गावांच्या सिमेवरती असल्याने स्थानिक ग्रामस्थ यांना अटकाव करत नाही. सुपा कामरगाव हद्दीच्या सिमेवर मासे टाकाऊ कुजलेले मांस टाकतात तर पवारवाडी घाट व जातेगाव घाटात नेहमीच खराब केमिकलचे टँकर खाली केले जातात. या दोन्ही ठिकाणी वन क्षेत्र आसल्याने जंगली प्राणी आहेत कित्येक वेळा या जंगली प्राण्यांनी पाणी समजून रात्रीच्या अंधारात आपला जीव गमवला आहे.

सुमारे वीस ते बावीस गावांची मुख्य बाजारपेठ असलेल्या सुपा शहरात येण्यासाठी वाळवणे रस्ता हा मुख्य रस्ता आहे. या रस्त्याच्या कडेला गेले दोन ते तीन वर्षांपासून कोंबड्यांचे कुजलेले मांस यासह इतर ओला व सुका कचरा टाकला जातो.या रस्त्यावरून शाळेत जाणारे विद्यार्थी, शेतात पिकवलेला माल मुख्य बाजारपेठ असलेल्या सुपा, पारनेर, पुणे, अहमदनगर याठिकाणी घेऊन जाणारे शेतकरी, कंपनी कामगार, व्यावसायिक, दुध उत्पादक यासह विविध गावांतील ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणात वावर असतो. वाळवणे खिंडीत आल्यानंतर नाक दाबून प्रवास करावा लागतो. सडके मांस याठिकाणी टाकण्यात येत असल्याने फिरीस्ती कुत्र्यांचा मोठा जमाव गोळा होतो. कचरा रस्त्याच्या कडेला टाकण्यात आल्याने हि कुत्री रात्रंदिवस या रस्त्यावर सैरावैरा धावत असतात यामुळे अनेक दुचाकीस्वार याठिकाणी पडले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. या कचऱ्याचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

अळकुटी येथील जादू शिरोळे हिचा पणजीत सन्मान

गोवा विधानसभेचे अध्यक्ष डॉ. रमेश तवडकर यांच्या हस्ते वितरण

चोंभूत : प्रतिनिधी

कल्याण ठाणे येथील ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा आर्ट ऑफ आयकॉन ''नॅशनल पिनॅकल अवॉर्ड २०२४'' हा पुरस्कार गोवा विधानसभेचे सभापती डॉ. रमेश तवडकर, बुंदेलखंड येथील जलयोध्दा पद्मश्री उमाशंकर पांडे, दैनिक गोमंतक सकाळचे वृत्त संपादक सचिन कोरडे यांच्या हस्ते तर पणजी (गोवा) येथे अभिनेत्री आशु सुरपूर, संस्थेचे संचालक प्रवीण साळवे यांच्या उपस्थितीत स्वीकारला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रियांका देवरे यांच्या कथकनृत्याने झाली.तद्नंतर दिगंबर पवार यांनी लावणी, तर जादुचे प्रयोग जादू शिरोळे व प्रकाश शिरोळे यांनी सादर केले.जादू शिरोळे ही लहान वयातच जादूचे प्रयोग सादर करते. पण त्याच बरोबर ज्या घरी पहिली मुलगी जन्माला येईल त्या घरी ती मोफत जादूचे प्रयोग सादर करते व लेक वाचवा लेक शिकवा असा संदेश देत आहे.जादू शिरोळे हिच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप प्रमाणपत्र, पदक व स्मृतिचिन्ह असे आहे.

जादू शिरोळे यांचेसह राज्यभरातील चाळीस पेक्षा अधिक जणांना पुरस्काराने गौरवण्यात आले.यावेळी गोवा विधानसभेचे अध्यक्ष डॉ. रमेश तवडकर, जलयोद्धा

पद्मश्री उमाशंकर पांडे यांनी आपले मनोगत व्यक्त करत सर्व पुरस्कारार्थी यांना शुभेच्छा दिल्या. जादू शिरोळे हिला पुरस्काराने सन्मानित केल्याने त्यांचा राज्यभरातील मित्रपरिवाराकडून शुभेच्छा संदेश पाठवत शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी राज्यभरातील पुरस्कारप्राप्ती यांचे स्नेही मित्रपरिवार,संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. संस्थेच्या वतीने प्रथमच राज्याबाहेर गोवा येथे दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळा घेतल्याने अनेकांनी संस्थेचे संचालक प्रवीण साळवे यांचेसह यांच्या सर्व सहकारी यांचे कौतुक केले. सूत्रसंचालन रुचिका भोंडवे यांनी, तर आभार सौ. साळवे यांनी मानले.

परिस्थितीशी झगडून शेतकरी पुत्राने एस.एस.सी. परीक्षेत मारली बाजी

श्रेयस शिरोळेनी पटकाविला प्रथम क्रमांक

चोंभूत : प्रतिनिधी

नुकत्याच जाहीर झालेल्या एस.एस.सी. इयत्ता दहावीच्या निकालामध्ये अळकुटी येथील श्री साईनाथ हायस्कूलचा विद्यार्थी चि. श्रेयश वसंत शिरोळे याने ९७.२०% गुण मिळवून शाळेमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील या मुलाने आपल्या आईवडिलांच्या कष्टाची जाण ठेवून आपली कुशाग्र बुद्धिमत्ता व सातत्यपूर्ण कष्टाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे व त्याला मार्गदर्शन करणारे शाळेतील सर्व शिक्षक व ज्ञान प्रबोधिनी कोचिंग क्लासेसचे श्री स्वप्निल शिरोळे सर यांचे अळकुटी परिसरातील मान्यवरांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

असेच यश संपादन करत राहिल्यास भविष्यात हा विद्यार्थी निश्चितपणे क्लास वन अधिकारी होऊ शकतो. त्याच्या भावी यशासाठी सर्व ग्रामस्थांकडून खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या.

मळगंगा ट्रस्टच्या बिनविरोध निवडणूकीसाठी सत्ताधाऱ्यांचा विरोध

यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांचा आरोप

निघोज : प्रतिनिधी

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टची निवडणूक बिनविरोध झाली पाहिजे यासाठी अध्यक्ष प्रभाकर कवाद, कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, माजी उपसरपंच उमेश सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव ढवण, शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद व सर्व पत्रकार तसेच ग्रामस्थांनी शेवटपर्यंत प्रयत्न केले मात्र ही निवडणूक बिनविरोध होऊ नये यासाठी काचेच्या घरात राहाणाऱ्यांनी प्रयत्न केले यासाठी दोन युवा पुढारी कारणीभूत आहेत. निवडणूक लढवणार नाही अशी खोटी शपथ घेऊन निवडणूकीला उभे राहून निवडणूक घडवून आणणाऱ्यांना जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा व देवीच कायमची अद्दल घडवील अशी खात्री मळगंगा यात्रा उत्सव समिती अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी व्यक्त केली आहे.

मळगंगा माऊली परिवर्तन पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त दत्तात्रय लाळगे, निघोज सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब लामखडे, माजी उपसरपंच उमेश सोनवणे, शिवबा संघटनेचे मुख्य पदाधिकारी राजूभाऊ लाळगे, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग, विलासराव हारदे, सोसायटीच्या संचालिका मनिषा वराळ यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव ढवण या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी दिलीप ढवण यांनी सांगितले की देवाच्या दारात राजकारण करुन सहकारी संस्था हुकुमशाही पद्धतीने चालवणाऱ्यांनी मोठे पाप केले आहे. तुमच्या संस्थेत सहकाराच्या नावाखाली काय चालते हे सर्वांना माहीत आहे. तुमच्या पापाचा घडा भरला आहे. सर्वानुमते ट्रस्ट निवडणूक बिनविरोध होत असतानाही दोन व्यक्तीमुळे ही निवडणूक लागली आहे. तुम्हाला खुर्ची मिळविण्याची घाई झाल्याने अध्यक्ष प्रभाकर कवाद व कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके यांना तुम्ही बाजूला करीत राजकारण करण्याचा प्रयत्न तुम्ही केला आहे मात्र माता मळगंगा तुम्हाला माफ करणार नाही याची प्रचिती लवकरच येणार असून माऊली मळगंगा परिवर्तन पॅनलचे सर्व उमेदवार विक्रमी मताधिक्याने विजयी करा असे आवाहन ढवण यांनी केले आहे.

यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले मात्र ज्यांना एकहाती सत्तेची घाई झाली त्या फक्त दोघांनीच निवडणूक करण्याचे पाप केले असून माऊली मळगंगा परिवर्तन पॅनलचे उमेदवार सक्षम असून सभासदांनी सत्ताधारी मंडळाला धडा शिकविण्यासाठी आमच्या पॅनलच्या सर्व उमेदवारांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद यांनी सत्ताधारी विरोधी नेत्यावर जोरदार टिकाटीप्पणी केली.शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे यांनी प्रचाराच्या नियोजनाची माहिती दिली. सकाळी आठ ते दुपारी एक तसेच दुपारी चार ते रात्री दहा वाजेपर्यंत सर्व मतदारांना पॅनलचे प्रमुख मळगंगा यात्रा समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव ढवण, सोसायटीचे माजी चेअरमन बाळासाहेब लामखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त दत्तात्रय लाळगे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, माजी उपसरपंच उमेश सोनवणे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मंगेशशेठ लाळगे, शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद, शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे तसेच सर्व कार्यकर्ते व उमेदवार मोठ्या संख्येने मतदारांना भेटून आपली भूमिका सांगणार आहेत अशी माहिती त्यांनी दिली. पारनेर तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष भास्करराव कवाद यांनी आभार मानले.

गुरुदेव शिक्षण संस्थेस राज्यस्तरीय पुरस्कार

सुपा : प्रतिनिधी

ध्येय अकॅडमी सातारा यांच्यातर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षण संस्था व संस्थाचालक हा पुरस्कार वितरण सोहळा नुकताच अंकुशराव लांडगे नाट्यगृह भोसरी, पुणे येथे संपन्न झाला.

सातारा येथील ध्येय अकॅडमी तर्फे दरवर्षी मानाचा समजला जाणारा हा एकमेव पुरस्कार यावर्षी अहमदनगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसी नजीकच्या गुरुदेव शिक्षण संस्थेस सर्व शैक्षणिक व सामाजिक बाबी तपासून दिला असल्याचे ध्येय अकॅडमीचे संचालक सुदाम शेंडगे व अर्चना शेंडगे यांनी सांगितले.
हा मानाचा पुरस्कार पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांच्या शुभहस्ते ट्रॉफी, शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन देण्यात आला. एकच ध्यास... विद्यार्थी विकास. हे ब्रीद वाक्य घेऊन अकॅडमीने महाराष्ट्रातील शिक्षणाची उंची वाढवण्यासाठी शैक्षणिक चळवळ सुरू केली आहे.

कुठल्याही परिस्थितीमध्ये आपला महाराष्ट्र स्पर्धा परीक्षांमध्ये पहिला आला पाहिजे हे संस्थेचे ध्येय आहे. म्हणून संस्थेने आय ॲम विनर ही स्पर्धा परीक्षा सुरू केली आहे. या स्पर्धा परीक्षेत गुरुदेव शिक्षण संस्थेतील नऊ विद्यार्थी राज्यस्तरीय यादीत व अकरा विद्यार्थी जिल्हास्तरीय यादीत झळकले आहेत. तसेच गुरुदेव शिक्षण संस्थेने विविध स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून राज्यात आपले स्थान प्राप्त केले आहे. तसेच वेगवेगळे सामाजिक उपक्रम गुरुदेव शिक्षण संस्था राबवत आहे.

संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर यांना यापूर्वी अहमदनगर जिल्हा परिषदेचा गुणवंत शिक्षक पुरस्कार व महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेला आहे. शिक्षण संस्थेने पाच वर्षांपूर्वी सुरू केलेल्या गुरुदेव सेमी इंग्लिश स्कूल या शाळेचा आज रोजी पट ९०० झालेला आहे. त्यामुळे संस्थेच्या शैक्षणिक व सामाजिक कामाची दखल घेऊन राज्यात एकमेव दिला जाणारा आदर्श संस्था व आदर्श संस्थाचालक हा पुरस्कार गुरुदेव शिक्षण संस्थेस प्राप्त झाला आहे. या पुरस्काराबाबत बोलताना संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर म्हणाले की, ग्रामीण भागातील मुलांना अत्यल्प फी मध्ये गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यात संस्था यशस्वी झाली आहे. यशाबद्दल पद्मभूषण अण्णा हजारे यांच्याकडून व विविध मान्यवरांकडून कौतुक केले जात आहे.

मळगंगा मंडळाचे उमेदवार विकासकामासाठी अग्रेसर

■ मंडळ विक्रमी मताधिक्याने विजयी होणार ■ रुपेश ढवण यांचा विश्वास

निघोज : प्रतिनिधी

मळगंगा मंडळाचे नेते अभ्यासू व कार्यक्षम असल्याने मळगंगा मंडळातील उमेदवार विकासासाठी अग्रेसर असल्याने मळगंगा मंडळाच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण यांनी केले आहे.

मळगंगा मंडळाच्या प्रचाराचा शुभारंभ ढवण, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे संघटक ॲड.बाळासाहेब लामखडे, सोसायटीचे माजी उपाध्यक्ष अनंतराव वरखडे, ग्रामपंचायत सदस्य दिगंबर लाळगे, भाऊ रसाळ , रमेश वरखडे, विष्णू लोखंडे, गणेश कवाद, ग्रामपंचायत सदस्य योगेश वाव्हळ, सोसायटीचे संचालक अनिल लामखडे आदींच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे उपाध्यक्ष शांताराम लंके, विश्वस्त वसंत कवाद, माजी सरपंच चंद्रकांत लामखडे, माजी सरपंच ठकाराम लंके , निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे माजी चेअरमन रामदास वरखडे,

उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, ॲड. ज्ञानेश्वर लामखडे, भिवा रसाळ, निघोज सोसायटीचे चेअरमन सुनिल वराळ, उपाध्यक्ष शांताराम लाळगे, संचालक शांताराम कवाद, दत्तात्रय लंके, सुनिल तांबे, दत्तात्रय लंके, जय मल्हार देवस्थान ट्रस्टचे सचिव सचिन लंके, ग्रामपंचायत सदस्य गणेश कवाद, सीमा संदिप वराळ, मोहिनी सोमनाथ वरखडे,रोहिदास लामखडे, शांताराम कळसकर, कांद्याचे व्यापारी खंडू घुले, संदीप वराळ,अशोक वरखडे, विठ्ठल शेटे, विश्वास शेटे, विकास शेटे, बाबाजी कळसकर, हौशाभाऊ शेटे, भरत ढवळे, राजेंद्र ढवळे, गणेश ढवण, सुखदेव ढवळे , नवनाथ लाळगे आदी तसेच विविध संस्थांचे संचालक तसेच सर्व उमेदवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ढवण यावेळी म्हणाले मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी पंचेचाळीस वर्षांपूर्वी हे रोपटे लावले असून त्यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली आजपर्यंत ट्रस्ट माध्यमातून कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली आहेत. गेली अनेक वर्षात या ठिकाणी विश्वस्त मंडळ माध्यमातून सर्वांनाच संधी मिळाली असून बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेली पाच वर्षात ट्रस्ट माध्यमातून मोठ्या प्रमाणात योगदान दिले असून तसेच निघोजच्या विकासामध्ये माजी सरपंच ठकाराम लंके व त्यांच्या सहकाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात योगदान असून आजपर्यंत कोट्यवधी रुपयांची कामे कवाद व लंके यांच्या माध्यमातून झाली असून हेच दोन युवा नेतृत्व कामाचे असल्याने मळगंगा मंडळातील उमेदवार विक्रमी मताधिक्याने विजयी होणार असल्याची खात्री ढवण यांनी व्यक्त केली.
कपिलेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष सोमनाथ वरखडे यांनी सांगितले की गेली चाळीस ते पंचेचाळीस वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे होऊन देवीचा नावलौकिक राज्यात झाला असून आजपर्यंत ज्यांनी विश्वस्त व पदाधिकारी म्हणून काम केले आहे.त्यांनी मोठ्या प्रमाणात विकासकासाठी योगदान दिले आहे. मळगंगा मंडळाचे उमेदवार अभ्यासू व कार्यक्षम आहेत. उमेदवार रुपेश ढवण यांना संधी मिळाली नाही मात्र त्यांचा अर्ज चुकून राहिला आहे त्यांनी मळगंगा मंडळाला पाठींबा दिला असून ढवण हे एक लोकाभिमुख नेतृत्व असून विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणात योगदान असल्याने त्यांना लोकमत असल्याने त्यांना नक्कीच संधी मिळेल अशी खात्री वरखडे यांनी व्यक्त केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल लंके यांनी केले तर संतोष रसाळ यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com